# सातारा जिल्हा परिषद ,सातारा

## पशुसंवर्धन विभाग

कार्यालय दुरध्वनी :- (०२१६२) २३३७९३ E-mail -: dahosatara@gmail.com

**अत्यंत महत्वाचे** जा.क्र.साजिप/जिपअ/आस्था-२/बदल्या/ /२०१८

दिनांक -: ०९ : ०५ : २०१८

---

**प्रति,**

**गट विकास अधिकारी,**
**पंचायत समिती ---------------------(सर्व)**

विषय -: सहाय्यक पशुधन विकास अधिकारी, पशुधन पर्यवेक्षक व व्रणोपचारक यांच्या बदल्यांची अंतिम वास्तव्य सेवा ज्येष्ठता यादी सन २०१८ प्रसिध्द करणेबाबत...

संदर्भ -:१.ग्राम विकास व जलसंधारण विभाग मंत्रालय मुंबई यांचेकडील शासन निर्णय क्रमांकः जिपब-४१४/प्र.क्र.११२/आस्था-१४ दिनांक १५/५/२०१४
२.ग्राम विकास व जलसंधारण विभाग मंत्रालय मुंबई यांचेकडील शासन शुध्दीपत्रक क्र.जिपब-४८१६/प्र.क्र.१३६/आस्था-१४ दिनांक ०२/०१/२०१७

उपरोक्त संदर्भिय विषयानुसार या विभागाकडील सहाय्यक पशुधन विकास अधिकारी, पशुधन पर्यवेक्षक व व्रणोपचारक या संवर्गाच्या तात्पुरत्या वास्तव्य सेवा जेष्ठता याद्या दिनांक २७/०४/२०१८ रोजी जिल्हा परिषदेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आल्या होत्या. सदरच्या यादींवर गट विकास अधिकारी पंचायत समिती यांचेकडून प्राप्त झालेल्या आक्षेप/हरकतींचा विचार करुन अंतिम यादी तयार करण्यात आलेली आहे.

**सदरची यादी सातारा जिल्हा परिषदेच्या www.zpsatara.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करणेत येत आहे.** तरी वरील संवर्गाच्या अंतिम वास्तव्य सेवा जेष्ठता यादी संबंधित कर्मचा-यांच्या निदर्शनास आणून, सर्व संबंधिताच्या स्वाक्षरी घेण्यात येवून दप्तरी ठेवण्यात याव्यात.

जिल्हास्तरीय सर्वसाधारण बदली समुपदेशनासाठी **दिनांक १४/०५/२०१८ रोजी सकाळी ठिक ११.३० वा.** ची वेळ या पशुसंवर्धन विभागास निश्चित करुन मिळाली आहे. सबब संबंधित सर्व सहाय्यक पशुधन विकास अधिकारी, पशुधन पर्यवेक्षक व व्रणोपचारक यांना **सातारा जिल्हा परिषदेच्या छत्रपती शिवाजी महाराज सभागृहात दि. १४/०५/२०१८ रोजी ठिक १०.०० वा.** उपस्थित राहणेबाबत आपल्या स्तरावरुन अवगत करण्यात यावे.

तसेच **पक्षाघाताने आजारी कर्मचारी, अपंग कर्मचारी / मतीमंद मुलांचे पालक व परितक्त्या/ घटस्फोटित महिला कर्मचारी, पती पत्नी एकत्रीकरण, तसेच वैदयकीय कागदपत्रे इ. पुराव्याची मूळ (Original) कागदपत्रे घेवून बदली समुपदेशनाच्यावेळी उपस्थित राहण्याचे आहे.** याबाबत सर्व संबंधितांना आपल्या स्तरावरुन सुचित करण्यात यावे.

**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद सातारा करीता**